# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

**१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१**

दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७

ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com


जा.क्र.शिउसं/उमाशि-२/अल्प. बैठक/पुवि/२०१६/ २०३४/८०

दिनांक :- 7 SEP 2016

प्रति,

**शिक्षणाधिकारी(माध्यमिक),**

**जिल्हा परिषद अहमदनगर/पुणे/सोलापूर**

**विषयः- इ. ११ वी मराठी युवकभारती या पुनर्रचित भाषा विषयाच्या पाठयपुस्तकाच्या विभागीय मंडळाने आयोजित करावयाच्या प्रशिक्षणाबाबत**

**संदर्भ : सचिव, राज्य मंडळ, पुणे-४ यांचे पत्र जा.क्र.रा.मं./संशोधन-२/४९९१ दि.२९.०८.२०१६**

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रानुसार इयत्ता ११ वी मराठी युवकभारती या पुर्नरचित भाषा विषयाचे पाठयपुस्तक नव्याने तयार केले असुन त्याची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून सुरु झालेली आहे. त्याबाबतचे शिक्षकांचे प्रशिक्षण घेण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

पुणे विभागातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील मराठी विषयाच्या शिक्षकांचे इ.११ वी मराठी युवकभारती या पुर्नरचित भाषा पाठयपुस्तकाच्या अभ्यासक्रमावर दि.१२.०९.२०१६ ते १७.०९.२०१६ या कालावधीत खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहे.

आपल्या अधिनस्त जिल्हयातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील मराठी विषयाच्या फक्त एका पुर्णवेळ शिक्षकाला सदर प्रशिक्षणासाठी उपस्थित रहाणेबाबत आपल्या स्तरावरुन तात्काळ कळविण्यात यावे.

ज्या कनिष्ठ महाविद्यालयात मराठी विषयाचे एकापेक्षा जास्त शिक्षक मंजुर असतील त्या कनिष्ठ महाविद्यालयातील फक्त एकाच शिक्षकास प्रशिक्षणासाठी उपस्थित रहाणेबाबत कळविण्यात यावे. संबधित शिक्षकाने इतर शिक्षकांना कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर प्रशिक्षण द्यावे व अहवाल या कार्यालयाकडे प्राचार्य यांचेमार्फत सादर करावा. (प्रशिक्षणार्थी यांनी इयत्ता ११ वी मराठी युवक भारतीचे पाठयपुस्तक सोबत आणावे).

सदर प्रशिक्षणासाठी निवडलेल्या केंद्रावर आवश्यक ती सर्व व्यवस्था ठेवण्याची जबाबदारी आपली राहील, प्रशिक्षणार्थींना दोन वेळा चहा व दुपारी अल्पोहार देण्याची व्यवस्था प्रशिक्षण केंद्रावर केली जाणार आहे. त्याबाबतची व्यवस्था तसेच आवश्यक प्रशिक्षण पूरक साहित्य ची व्यवस्था केंद्र संचालक यांचेकडुन करवून घ्यावी व प्रशिक्षणाचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

| अ. क्र. | जिल्हयाचे नांव | दिनांक व वेळ | प्रशिक्षणाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | पुणे | दि.१२.०९.२०१६<br>स.९.३० ते ५.३० | राजीव गांधी ईलर्निंग स्कूल, सहकारनगर, पुणे-६<br>**संपर्क मो.नं- ९८२२२६०७६४** |
| २ | अहमदनगर | दि.१४.०९.२०१६<br>स.९.३० ते ५.३० | न्यु आर्टस,कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, लाल टाकी रोड, अहमदनगर |
| ३ | सोलापूर | दि.१७.०९.२०१६<br>स.९.३० ते ५.३० | वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय, अशोक चौक, सोलापूर |

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

१) मा. आयुक्त, शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे-१

**२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, म.रा.पुणे.**

३) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे